सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहितीचा अधिकार
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्रामः "MEDUCATNSEARCH" फॅक्सः+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org

क्र.संवैशिवसं/१२२१/सीपीएस/प्रवेश प्रक्रिया/२१/२-अ, दिनांक - २५.११.२०२१

## कार्यालयीन आदेश

**विषय - राज्यातील सीपीएस अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरिता कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत...**

**संदर्भ - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक सीपीएस ३८२०/प्र.क्र.७०/२०/शिक्षण-२, दिनांक २२ नाव्हेंबर, २०२१.**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक सीपीएस ३८२०/प्र.क्र.७०/२०/शिक्षण-२, दिनांक २२ नाव्हेंबर, २०२१ नुसार आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सूचनेस अनुसरुन कॉलेज ऑफ फिजीशियन्स आणि सर्जन्स (सीपीएस), मुंबई यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यातील मान्यताप्राप्त वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासूनची प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांना "सक्षम प्राधिकारी" म्हणून नियुक्ती केलेली आहे, सदर निर्णयामध्ये आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेमार्फत समिती गठीत करण्यात येईल असे नमूद केलेले आहे. त्याअनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेमार्फत खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | ..... अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष, कॉलेज ऑफ फिजीशियन ॲन्ड सर्जन्स्, मुंबई | ..... सदस्य |
| ३. | डॉ.अरुणकुमार व्यास, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | ..... सदस्य |
| ४. | डॉ. सुशिल दुबे, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | ..... सदस्य |
| ५. | डॉ.बी.एन.हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | ..... सदस्य सचिव |

वरील समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१. सदर प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व सुरळीतपणे राबविण्याकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे मान्यतेने आवश्यक ती सर्व कार्यवाही करतील.

२. सीपीस अभ्यासक्रमाचे उक्त सर्व प्रवेश हे संबंधित शैक्षणिक वर्षासाठीच्या "नीट-पीजी" या अखिल भारतीय स्तरावरील प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेनुसार करण्यात येतील.

३. सदर प्रवेश प्रक्रिया राबविण्याकरिता सीपीएस संस्थेकडून आवश्यक माहिती प्राप्त करुन आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे मान्यतेने प्रवेश प्रक्रियेची माहिती पुस्तिका (Brochure) तयार करण्यात येईल व त्यास शासनाची मान्यता घेण्यात येईल.

४. प्रवेश प्रक्रियेच्या कामाकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे मान्यतेने विहित पध्दतीने उचित एजन्सीची निवड करता येईल.

वरील समितीने तातडीने बैठक आयोजित करुन सीपीएस प्रवेश प्रक्रियेची नियमावली पुस्तिका, उपलब्ध जागांचा तक्ता, प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक इत्यादी तयार करण्याबाबतची कार्यवाही तातडीने सुरु करावी व त्याबाबतचा अहवाल आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचेकडे सादर करावा.

**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य**

प्रति,

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
२. अध्यक्ष, कॉलेज ऑफ फिजीशियन अॅन्ड सर्जन्स्, मुंबई
३. डॉ.बी.एन.हिवाळे, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
४. डॉ.अरुणकुमार व्यास, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
५. डॉ. सुशिल दुबे, विशेष कार्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

प्रत माहितीकरिता -
मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई